बातमी पत्र

जनसंपर्क विभाग,
पोलीस अधिक्षक यांचे कार्यालय, उस्मानाबाद

दिनांक १७/०५/२०१२

## " उस्मानाबाद शहर येथे मोटार सायकलच्या धडकेत एकजन जखमी "

**पो.स्टे. उस्मानाबाद शहर :-** दिनांक १६/०५/२०१२ रोजी दुपारी १३० वाजण्याचे सुमारास सांजा उस्मानाबाद रोडवर रणजीत टेलर यांचे दुकानाजवळील रोडवर नाजमोददीन मोहंमद शेख वय ६० वर्षे रा.सांजा ता.जि.उस्मानाबाद हे रिक्षा नंबर एमएच २५/एम ६४ मधुन उतरुन रणजीत टेलर यांचे दुकानाकडे जात असतांना सुग्रीव नांदे रा. राजे बोरगाव ता.जि.उस्मानाबाद याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्रमांक एमएच २५/एक्स ७९१३ ही भरघाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन नाजमोददीन शेख यांना जोराची धडक देवुन गंभीर जखमी केले असल्याची फिर्याद जमीर उस्मान शेख वय २५ वर्षे याने दिनांक १६/०५/२०१२ रोजी पो.स्टे.उस्मानाबाद शहर येथे दिल्याने सुग्रीव नांदे यांच्या विरुध्द भादंविचे कलम २७९, ३३७,३३८ प्रमाणे गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन तपास पोहेकॉ पवार हे करीत आहेत.

## " वडगाव ( सि ) येथे इलेक्ट्रीक शॉक लागुन मुलाचा मृत्यु "

**पो.स्टे. उस्मानाबाद शहर :-** दिनांक १६/०५/२०१२ रोजी दुपारी १४० वाजण्याचे सुमारास वडगाव सिध्देश्वर येथील किशोर राजेंद्र बागल वय १५ वर्षे यास इलेक्ट्रीक शॉक लागल्याने सरकारी दवाखाना उस्मानाबाद येथे दाखल केले असता औषधोपचार चालु असतांना तो मयत झाला असल्याची खबर डॉ. बागल, वैद्यकीय अधिकारी उस्मानाबाद यांनी दिनांक १६/०५/२०१२ रोजी पो.स्टे.उस्मानाबाद शहर येथे दिल्याने आकस्मात मयत म्हणुन नोंद करण्यात आली असुन तपास पोहेकॉ कोलंगडे हे करीत आहेत.

## " उपळा शिवारातील शेतातुन जनावराची चोरी "

**पो.स्टे. उस्मानाबाद ग्रामीण :-** दिनांक १६/०५/२०१२ रोजी रात्री १ ते ५ वाजण्याचे दरम्यान उपळा येथील विक्रम दगडोबा पडवळ वय ६८ वर्षे रा.तडवळा यांचे उपळा शिवारातील शेतातुन एक बैल जोडी किंमत रु.४०,०००/- ची कोणीतरी अज्ञात चोरटयांनी दावे तोडुन चोरुन नेले असल्याची फिर्याद विक्रम दगडोबा पडवळ यांनी दिनांक १६/०५/२०१२ रोजी पो.स्टे. उस्मानाबाद ग्रामीण येथे दिल्याने अज्ञात चोरटयांविरुध्द भादंविचे कलम ३७९ प्रमाणे गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन तपास पोहेकॉ जाधव हे करीत आहेत.

## " तुळजापुर ते औसा जाणारे रोडवर दोन मोटारसायकलची धडक "

**पो.स्टे. बेंबळी :-** दिनांक १३/०५/२०१२ रोजी सकाळी ११५ वाजण्याचे सुमारास तुळजापुर ते औसा जाणारे रोडवर तोंरबा पाटी येथे गौतम मलका जाधव वय ४५ वर्षे रा. कनगरा हे त्यांची मोटारसायकल क्रमांक एमएच १४/एएन १४५१ वर बसुन गावाकडे जात असतांना समोरुन मोटारसायकल क्रमांक एमएच १३/एपी १४५० च्या चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व भरघाव वेगात चालवुन गौतम जाधव यांच्या मोटारसायकलला जोराची धडक दिल्याने त्यांचे डाव्या पायाचे नडगीवर जोरात धडक दिल्याने पायास मार लागुन गंभीर जखमी केले व दोन्ही मोटारसायकलचे नुकसान होणेस कारणीभुत झालेल्या मोटारसायकल चालका विरुध्द गौतम जाधव यांनी दिनांक १६/०५/२०१२ रोजी पो.स्टे.बेंबळी येथे फिर्याद दिल्याने भादंविचे कलम २७९,३३७,३३८,४२७ प्रमाणे गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन तपास पोहेकॉ चव्हाण हे करीत आहेत.

## " रुईभर येथे मागील भांडणाची कुरापत काढुन मारहाण "

**पो.स्टे. बेंबळी :-** दिनांक १३/०५/२०१२ रोजी दुपारी २३० वाजण्याचे सुमारास रुईभर येथील श्रीमती सायरा वजीर पठाण वय ५५ वर्षे ही व तिचा पती घरासमोर उभे असतांना १) हाजीमलंग बाबु पठाण, २) खाजाबाई बाबु पठाण, ३) रुक्साना अमीर पठाण, ४) जमीर खाजा पठाण सर्व रा. रुईभर या लोकांनी संगणमत करुन मागील भांडणाची कुरापत काढुन श्रीमती सायरा पठाण व तिच्या पतीस शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली व हाजीमलंग पठाण याने कु-हाडीच्या दांडयाने श्रीमती सायरा पठाण यांच्या डोकीत मारुन त्यांना गंभीर जखमी करुन जीवे मारण्याची धमकी दिली असल्याची फिर्याद श्रीमती सायरा पठाण यांनी दिनांक १६/०५/२०१२ रोजी पो.स्टे.बेंबळी येथे दिल्याने भादंविचे कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन तपास पोहेकॉ पवार हे करीत आहेत.

पान नं २ वर

**" कळंब येथे मारहाण केलेल्या व्यक्तीविरुध्द गुन्हयाची नोंद "**

**पो.स्टे. कळंब :-** दिनांक १४/०५/२०१२ रोजी दुपारी २ वाजण्याचे सुमारास मार्केट यार्ड कळंब येथे राजेंद्र शामराव काळे वय ५२ वर्षे यास १. तानाजी सुर्यभान पवार, २. माधव कल्याण पवार, ३. रविंद्र शामराव काळे, ४. लक्ष्मण बाबुशा पवार, ५. सुभाष सुर्यभान पवार सर्व रा. कळंब या लोकांनी त्यांच्या जात पंचायतीमध्ये बोलावुन त्याचेवर रु.२४०००/- बसविले ते राजेंद्र काळे यास मान्य नसल्याने वरील लोकांनी तु पैसे का देत नाहीस असे म्हणुन शिवीगाळ व लाथाबुक्याने मारहाण करुन जखमी केले व जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले असल्याची फिर्याद राजेंद्र काळे याने दिनांक १६/०५/२०१२ रोजी पो.स्टे.कळंब येथे दिल्याने वरील लोकांविरुध्द भादंविचे कलम १४७,१४८,१४९, ३२४, ३२३,५०४,५०६ व कलम १३५ मु.पो.ॲक्ट प्रमाणे गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन तपास पोउपनि जाधव हे करीत आहेत.

**" दगडधानोरा बस स्टॉपवर बस वाहकास मारहाण केलेल्या व्यक्तीविरुध्द गुन्हा "**

**पो.स्टे. उमरगा :-** दिनांक १६/०५/२०१२ रोजी सायंकाळी ६४० वाजण्याचे सुमारास प्रभाकर रघुनाथ फरीदाबादकर, वाहक बस डेपो उमरगा हे चालक ए.बी.पाटील एस.टी.आगार उमरगा असे उमरगा ते लाडवंती बस घेवुन जात असतांना तुरोरी येथील पिन्टु सुधाकर थिटे रा.दगडधानोरा हा बस मध्ये चढला तो दारु पिलेल्या अवस्थेत होता त्याने बसवाहकाशी तिकीटाचे पैसे देण्याच्या कारणावरुन हुज्जत घालुन दगडधानो-याच्या अलीकडे उतरुन येथे स्टॉप आहे का तु येथे गाडी का थांबवीली असे म्हणुन बस वाहक प्रभाकर फरिदाबादकर यांना शिवीगाळ करुन त्यांना लाथाबुक्याने मारहाण करुन शासकिय कामात अडथळा निर्माण केला असल्याची फिर्याद प्रभाकर फरीदाबादकर यांनी दिनांक १६/०५/२०१२ रोजी पो.स्टे.उमरगा येथे दिल्याने पिन्टु सुधाकर थिटे यांच्या विरुध्द भादंविचे कलम ३५३, ३२३ प्रमाणे गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन तपास पोहेकॉ गिरी हे करीत आहेत.

**" सिंदफळ येथे शासकिय रक्कमेचा अपहार केलेल्या व्यक्तीविरुध्द गुन्हयाची नोंद "**

**पो.स्टे. तुळजापुर :-** मौजे सिंदफळ येथील सुभाष शिवराज व्यवहारे, सरपंच सिंदफळ, व ए.आर.तुपेरे, तत्कालीन ग्रामसेवक सिंदफळ हे सन २००५ ते २००६ या काळात सिंदफळ हे आपले पदावर असतांना सन २००५ -२००६ या आर्थीक वर्षात यशवंत ग्रामसमृध्दी योजने अंतर्गत सिमेंट कॉक्रेटचा रस्ता व शौचालयाचे बांधकाम यासाठी अनुक्रमे रु.३,९९,०३४/- व १,६६,६६६/- रुपये एवढा खर्च केला सदर कामाचे मोजमापात रस्त्याचे रु.३,५५,०३८/- व शौचालयाचे रु.६८१८८/- असे मुल्यांकन दाखवुन कामाच्या पुर्णत्वाचा दाखला दिला आहे. वरील दोघांनी नमुद कामात एकुण रु.१,४२,१८४/- रुपयाचा शासकिय रक्कमेचा अपहार केला असल्याची फिर्याद संजय सुर्यभान राऊत, विस्तार अधिकारी , पंचायत समिती तुळजापुर यांनी दिनांक १६/०५/२०१२ रोजी पो.स्टे.तुळजापुर येथे दिल्याने भादंविचे कलम ४२०,४०९,४०६,३४ प्रमाणे गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन तपास पोहेकॉ शिंदे हे करीत आहेत.

**पोलीस अधीक्षक उस्मानाबाद**
**करिता**